दैनिक
# प्रतिवीर
सोलापूर/कोल्हापूर/औरंगाबाद/उस्मानाबाद/नांदेड/लातूर/बीड/अहमदनगर/मुंबई/पुणे
Email ID : newsprativeer@gmail.com
किंमत

## धारूर महाविद्यालयात आर्थिक साक्षरता कार्यशाळा संपन्न



**किल्लेधारूर/प्रतिनिधी**

येथील कला,वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयामध्ये आर्थिक साक्षरता कक्षाच्या वतीने दिनांक १२ व १३ जानेवारी २०२३ जानेवारी रोजी राष्ट्रीय प्रतिभूती बाजार संस्थान यांच्या वतीने राबविण्यात येणारा कोणा कोणा शिक्षा या अंतर्गत बीड जिल्ह्यातील धारूर महाविद्यालय हे कोणा कोणा शिक्षा अंतर्गत आर्थिक तरुणांसाठी आर्थिक शिक्षण या विषयावरील कार्यशाळा घेणारे बीड जिल्ह्यातील पहिले महाविद्यालय आहे.

या योजनेअंतर्गत तरुणांसाठी आर्थिक शिक्षण या विषयावरील दोन दिवशी कार्यशाळा महाविद्यालयातील वाणिज्य विभाग व वित्तीय साक्षरता कक्षाच्या वतीने आयोजित करण्यात आली होती. या कार्यशाळेचे अध्यक्ष महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. गोपाळ काकडे हे होते. कोणकोणत्या प्रकारे आपणास आर्थिक बचत करता येईल याची माहिती झाल्याने भविष्यात आपण यासंबंधी सकारात्मक विचार कराल असेही मत व्यक्त केले.

यावेळी प्रमुख मार्गदर्शक म्हणून अधिकृत आर्थिक सल्लागार श्री. गोविंद कोल्हे यांनी तरुणांसाठी आर्थिक साक्षरता या विषयावर शेअर मार्केट व म्युच्युअल फंड याविषयी सखोल व सविस्तर मार्गदर्शन केले. विविध प्रकारे कोणकोणत्या ठिकाणी आपण बचत करू शकतो या संबंधीची विविध उदाहरणे व माहिती दिली. आर्थिक बचतीच्या माध्यमातून होणारे फायदे याविषयी विविध प्रश्न व त्यांचे सोप्या पद्धतीने निराकरण केले.

जीवनात प्रत्येकाने आर्थिक साक्षर असणे गरजेचे असल्याचे मत या प्रसंगी त्यांनी नमूद केले. तरुणांसाठी आर्थिक या कार्यशाळेसाठी साक्षरता या कार्यशाळेसाठी महाविद्यालयातील उपप्राचार्य मेजर डॉ. एम. एन. गायकवाड, उपप्राचार्य प्रा. महादेव जोगडे, पर्यवेक्षक प्रा. सिद्धेश्वर काळे आर्थिक साक्षरता कक्षाचे प्रमुख डॉ. विजयकुमार कुंभारे यांबरोबरच महाविद्यालयातील विद्यार्थी व प्राध्यापक यांची उपस्थिती मोठ्या प्रमाणात होती. कार्यशाळेचे प्रास्ताविक डॉ. विजयकुमार कुंभारे यांनी केले. कार्यशाळेचे सूत्रसंचालन डॉ. विजयकुमार कुंभारे यांनी तर आभार प्रा. आदित्य सोळंके यांनी मानले.

# धारूर महाविद्यालयात आर्थिक साक्षरता कार्यशाळा संपन्न

किल्ले धारूर । वार्ताहर

येथील मराठवाडा शिक्षण प्रसारक मंडळाच्या कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयामध्ये आर्थिक साक्षरता कक्षाच्या वतीने दिनांक १२ व १३ जानेवारी २०२३ जानेवारी रोजी राष्ट्रीय प्रतिभूती बाजार संस्थान यांच्या वतीने राबविण्यात येणारा 'कोणा कोणा शिक्षा' या अंतर्गत बीड जिल्ह्यातील धारूर महाविद्यालय हे कोणा कोणा शिक्षा अंतर्गत आर्थिक तरुणांसाठी आर्थिक शिक्षण या विषयावरील कार्यशाळा घेणारे बीड जिल्ह्यातील पहिले महाविद्यालय आहे.



या योजने अंतर्गत तरुणांसाठी आर्थिक शिक्षण या विषयावरील दोन दिवशी कार्यशाळा महाविद्यालयातील वाणिज्य विभाग व वित्तीय साक्षरता कक्षाच्या वतीने आयोजित करण्यात आली होती. या कार्यशाळेचे अध्यक्ष महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. गोपाळ काकडे हे होते. त्यांनी आपल्या मनोगतातून उपस्थितांना संबोधित करताना सांगितले की, आर्थिक संपन्नता हा आजच्या काळातील महत्त्वाच्या भाग झाला आहे. जीवनामध्ये केलेले आर्थिक नियोजन भविष्यात अडचणींचा सामना करण्यास बळ देते. या व्याख्यानाच्या माध्यमातून सर्व विद्यार्थ्यांना व उपस्थितांना आर्थिक बचतीच्या माध्यमातून होणाऱ्या फायद्यांची माहिती झाली. कोणकोणत्या प्रकारे आपणास आर्थिक बचत करता येईल याची माहिती झाल्याने भविष्यात आपण यासंबंधी सकारात्मक विचार कराल असेही मत व्यक्त केले. यावेळी प्रमुख मार्गदर्शक म्हणून अधिकृत आर्थिक सल्लागार . गोविंद कोल्हे यांनी तरुणांसाठी आर्थिक साक्षरता या विषयावर शेअर मार्केट व म्युच्युअल फंड याविषयी सखोल व सविस्तर मार्गदर्शन केले. विविध प्रकारे कोणकोणत्या ठिकाणी आपण बचत करू शकतो या संबंधीची विविध उदाहरणे व माहिती दिली.

आर्थिक बचतीच्या माध्यमातून होणारे फायदे याविषयी विविध प्रश्न व त्यांचे सोप्या पद्धतीने निराकरण केले. जीवनात प्रत्येकाने आर्थिक साक्षर असणे गरजेचे असल्याचे मत या प्रसंगी त्यांनी नमूद केले. तरुणांसाठी आर्थिक या कार्यशाळेसाठी साक्षरता या कार्यशाळेसाठी महाविद्यालयातील उपप्राचार्य मेजर डॉ. एम. एन. गायकवाड, उपप्राचार्य प्रा. महादेव जोगडे, पर्यवेक्षक प्रा. सिद्धेश्वर काळे आर्थिक साक्षरता कक्षाचे प्रमुख डॉ. विजयकुमार कुंभारे यांबरोबरच महाविद्यालयातील विद्यार्थी व प्राध्यापक यांची उपस्थिती मोठ्या प्रमाणात होती. कार्यशाळेचे प्रास्ताविक डॉ. विजयकुमार कुंभारे यांनी केले. कार्यशाळेचे सूत्रसंचालन डॉ. विजयकुमार कुंभारे यांनी तर आभार प्रा. आदित्य सोळंके यांनी मानले.